श्री



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ-
पत्रिका

वर्ष ८ वें — दिनांक सौरकार्तिक १५.१८९

अंक १२ वा — वार्षिक वर्गणी १ रुपाया

राष्ट्रदेवो भव । नोव्हेंबर दि. ६।११।१९६९

अनुक्रम

दूरवाणी ५६६२८ — तार–लोकसंग्रह

☆ संस्कृत – अध्यापक – संमेलन ☆

(दि. १४,१५, व १६ नोव्हेंबर १९६९)

स्थान– पुणें अनाथ विद्यार्थी गृह

१७८६ सदाशिव, पुणें ३०.

माननीय शिक्षणमंत्री ना. मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन, शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर, सायं. ६–३० वा.

वर्ष १५ वे] संस्कृत विविध स्पर्धा [१९६९-७०

दरसालप्रमाणें संस्कृत काव्यगायन कथाकथन, अन्त्याक्षरी (भेंड्या), वाक्य-संयोजन, स्मरणशक्ति, पूर्वनियोजित वक्तृत्व, तात्कालिक वक्तृत्व, गद्यपद्यपाठान्तर इत्यादि संस्कृत विविध स्पर्धा जानेवारी १९७० च्या पहिल्या आठवड्यांत होतील. स्पर्धेमध्यें भाग घेऊं इच्छिणाऱ्या स्पर्धकांची नांवें शिक्षण संस्थेमार्फत २० डिसेंबर १९६९-७० पूर्वी वय, स्पर्धा विभाग, गट इत्यादि अपेक्षित माहितीसह कळवावी. भाग घेणाऱ्या स्पर्धकांचे बाल व प्रौढ असे दोन गट शक्यतेनुसार करण्यांत येतील. स्पर्धानियम व इतर जरूर माहिती संस्कृत विविध स्पर्धा व्यवस्थापक श्रीबाल-मुकुंद संस्कृत महाविद्यालय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणें ३०. यांचेकडे १५ नोव्हेंबर १९६९ नंतर मिळेल

दूरवाणी-५७८७४

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
१२४२, सदाशिव, पुणें ३०.

संस्कृत-अध्यापक संमेलन

संमेलनाच्या कार्यक्रमास जोडून होणारे अन्य कार्यक्रम

दि. १४-११-१९६९ शुक्रवारी रात्री ९-३० वाजतां
महाराष्ट्र शासनाने सत्कार केलेल्या पांच वैदिकांचा सत्कार
(वैदिक सत्कार समिति, पुणे यांचेतर्फे)

महाराष्ट्र संस्कृत परिषद्

षष्ठ अधिवेशनाचें उद्घाटन

दि. १५-११-१९६९ शनिवारी सायंकाळी ६ वाजतां
स्थान-पुणें अनाथ विद्यार्थी गृह, १७८६, सदाशिव, पुणें ३०.
दि. १६-११-१९६९ रविवार दुपारी २-३० ते ५-३०

प्रकट अधिवेशन व समारोप

रात्री ८ वाजतां महाराष्ट्र संस्कृत परिषदेच्या सदस्यासाठी भोजन

* जे प्रतिनिधि तीन रुपये भरून " महाराष्ट्र-संस्कृत-परिषदेचे " सदस्य होतील, त्यांना रविवारी रात्रीचे भोजन निःशुल्क असेल. संस्कृत-अध्यापक-संमेल-नाच्या प्रतिनिधींनी संस्कृतसंबंधी संघटित कार्यासाठी " महाराष्ट्र-संस्कृत-परि-षदेचे " सदस्य व्हावे.

* टीप-प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था 'पुणे अनाथ विद्यार्थी गृह' या संस्थेत केलेली आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें ३०.

संस्कृत-अध्यापक-संमेलन





डॉ. ग. श्री. खैर,
अध्यक्ष, परिसंवाद विभाग

उद्घाटक
ना. मधुकरराव चौधरी





स्वागताध्यक्ष
म. म. द. वा. पोतदार,

श्री. ग. वि. अकोलकर,
संमेलनाध्यक्ष

शिक्षणखात्याचे खास परिपत्रक

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे भरणाऱ्या संस्कृत-अध्यापक-संमेलनास उपस्थित राहू इच्छिणाऱ्या शिक्षक-शिक्षिकांना व शाला-संचालकांना उपयुक्त ठरणारे असें खास परिपत्रक महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणविभागाने सत्वर प्रसिद्ध करून संस्कृतविषयी जो जिव्हाळा व्यक्त आहे त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. सदर परिपत्रकाचा लाभ घेऊन अधिकाधिक शिक्षकांनी संमेलनास यावे अशी विनंती आहे.

त्वरित:

क्रमांक. संस्कृत-३६६९।१७११७-क,
पुणे-१, २३-१०-१९६९

प्रति:

शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद(महाराष्ट्र राज्यातील सर्व).
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे, औरंगाबाद, मुंबई व नागपूर विभाग.
शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई.

विषय:- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे तर्फे भरणारे संस्कृत अध्यापक संमेलन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी संस्कृत शिक्षक-शिक्षिकांसाठी संस्कृत संमेलन दिनांक १३ नोव्हेंबर १९६९ ते १७ नोव्हेंबर १९६९ पर्यन्त आयोजित केले आहे. संस्कृत शिक्षणाचे प्रसार व प्रचार करणे हे संमेलनाचें प्रमुख उद्देश आहेत. श्वेतपत्रिकेत २-४(ग) मध्यें संस्कृतचे विकासास विशेष प्रोत्साहन यावें असे शासनाचें संस्कृतचे विकासाबाबतचे संकल्पित ध्येय धोरण आहे. व त्यानुषंगाने संस्कृतचे विकासाबाबत शासन प्रयत्नशिल आहे. तरी सदरहू संमेलनाची माहिती माध्यमिक शाळांचे प्रमुखास कळवावी व अनुदान संहितेमध्यें नमूद केलेल्या नियमानुसार माध्यमिक शाळातील संस्कृत शिक्षकास संस्थेने सदर संम्मेलनास पाठवावयास हरकत नाही. तसेंच त्यांचे अनुपस्थितीचा काल कसा ठरवावा हे संस्थेने आपल्या अधिकारात ठरवावे. कृपया वरील मजकूर आपल्या कक्षेतील माध्यमिक शाळांच्या नजरेस आणावा.

ज्ञानपुरे-२३-१०

२४।१०
शिक्षण संचालककरिता.

प्रत प्रचारक, टिळक ~~[illegible]~~ महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना माहितीसाठी अग्रेषित.

पत्रक क्र. ३. | दूरवाणी ५७८७४

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

१२४२, सदाशिव पेठ, पुणें ३०

संस्कृत - अध्यापक - संमेलन

दि. १४, १५ व १६ नोव्हेंबर, १९६९.

स्थान–पुणें अनाथ विद्यार्थी गृह
१७८६ सदाशिव, पुणें ३०.
(दूरवाणी–५६६२८)

कार्यक्रम पत्रिका

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर १९६९

सायंकाळी ६–३० ते ८
उद्घाटन माननीय शिक्षणमंत्री,
ना. मधुकरराव चौधरी, यांचे हस्ते.
स्वागतपर भाषण–माननीय कुलगुरु,
म. म. प्रा. द. वा. पोतदार (स्वागताध्यक्ष)
उद्घाटकांचे भाषण–मा. शिक्षणमंत्री,
ना. मधुकरराव चौधरी
अध्यक्षीय भाषण–
माननीय प्रा. ग. बि. अकोलकर
आभार–
श्री. दुर्गादत्त शर्मा,
कार्याध्यक्ष, स्वागतसमिति.

रात्री ८–३० ते ९–३०
भोजन.

शनिवार दि. १५ नोव्हेंबर, १९६९.

प्रात: ८–३० ते ११–३०	" संस्कृत अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन त्यांतील अडीअडचणी " या विषयावर परिसंवाद परिसंवादाचे अध्यक्ष– डॉ. ग. श्री. खैर * यात भाग घेऊ इच्छिणाऱ्या प्रतिनिधि वक्त्यांनी शुक्रवार दिनांक १४ रात्रीपर्यंत आपली नांवे कार्यालयांत नोंदवावीत.
दुपारी १२ ते २	भोजन व विश्रांती.
दुपारी २–३० ते ३–३०	संस्कृतसंबंधी विविध उपयुक्त विषयावर तज्ज्ञांची मार्गदर्शक भाषणें. (पूर्वार्ध) अध्यक्ष– माननीय मा. सी. पेंढारकर, निवृत्त प्राचार्य, पार्ले टिळक विद्यालय, मुंबई.
दुपारी ३–३० ते ४–००	जलपान.
दुपारी ४ ते ५–३०	तज्ज्ञांची मार्गदर्शक भाषणें (उत्तरार्ध)
रात्रौ ८ ते ९–३०	भोजन.
रात्रौ १०–००	" संगीत-भर्तृहरीयम् " संस्कृत नाट्यप्रयोग

रविवार, दि. १६ नोव्हेंबर १९६९

प्रात: ९ ते ११–३०	संस्कृत-अध्यापक-संमेलनाचा समारोप. वक्ते– श्री. डॉ. ग. श्री. खैर, श्री. मा. सी पेंढारकर श्री. ग. वि. अकोलकर धन्यवाद वितरण– श्री. श्री. धुं. कवीश्वर वन्दे मातरम्
दुपारी १२ ते २	भोजन व विश्रांती

———

संस्कृत–अध्यापक–संमेलन

शनिवार दि. १५ नोव्हेंबर १९६९ रोजी

दुपारी (२–३० ते ५–३०) होणाऱ्या मार्गदर्शक

भाषणांचे विषय व वक्ते

१) महाराष्ट्रातील संस्कृत पाठशाळा–
श्री. संभाजीराव टिकम, शिक्षण–उपसंचालक.

२) पूर्व प्राथमिक ते विश्वविद्यालयीन संस्कृत शिक्षणाचे स्वरूप–
प्रा. अरविंद मंगरूळकर.

३) संस्कृत–अध्यापनाची योग्य पद्धति–
पं. प्र. शं. जोशी मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, (रमणबाग) पुणे.

४) संस्कृत शिक्षणामध्यें पाठान्तराचे स्थान व व्याप्ति–
पं. पं. ना. पाठक कन्याशाळा, सातारा.

५) जनतेमध्यें संस्कृतसंबंधी गोडी उत्पन्न करण्याचे प्रयत्न–
पं. वसन्त अ. गाडगीळ, संपादक, " शारदा "

६) संस्कृत व्याकरणाची चालू योग्य परिभाषा–
पं. वा. बा. भागवत

७) संस्कृत परीक्षांचे आजचे स्वरूप, त्यांचे परिणाम–
पं. शि. ह धुपकर

८) संस्कृत अध्यापकांची पात्रता वाढविण्याचे उपाय–
पं. ज. पु. जोशी आरवडे हायस्कूल, सांगली

९) संस्कृत प्रश्नपत्राच्या (एस् एस्. सी.) स्वरूपाची युक्तायुक्तता–
पं. वि. गो. देसाई विद्यापीठ हायस्कूल, कोल्हापूर.

१० पाश्चात्यांच्या दृष्टिकोनातून संस्कृत–
प्रा. मेसन्, डेक्कन कॉलेज, पुणे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें.

४८ वा वार्षिक वृत्तान्त

ता. १ एप्रिल १९६८ ते ३१ मार्च १९६९ अखेर

प्रास्ताविक –

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचें अठ्ठेचाळीसाव्या वर्षातील कार्याचें इतिवृत्त जनतेसमोर ठेवण्यास समाधान वाटत आहे. संस्कृत, मराठी, इंग्रजी भाषापरीक्षा, गणितपरीक्षा, संस्कृतशास्त्रपरीक्षा, सर्वोदय, चित्रकला परीक्षा, पाठ्यपुस्तकें व ग्रंथ-संशोधनप्रकाशन, संस्कृतमहाविद्यालय, महाराष्ट्र-ग्रामकोश मंडळ, मुक्तद्वार संस्कृत ग्रंथालय, टिळक–महाराष्ट्र–विद्यापीठ-पत्रिका व टिळक विद्यापीठ मुद्रणालय, सुवर्ण महोत्सव ग्रंथ प्रकाशन इत्यादि सर्व उपक्रम वृत्तांतवर्षांत व्यवस्थितपणे चालू होते. या सर्व उपक्रमाचे व संलग्न शाखासंस्थाच्या कार्याचें वार्षिक इतिवृत्त क्रमशः पुढें दिलें आहे.

नव्या उपक्रमांची प्रगति–

राष्ट्रीय विद्यापीठ म्हणून गेली अठ्ठेचाळीस वर्षे अनुस्यूतपणें विद्यापीठाचें कार्य चालू आहे. यापुढें विद्यापीठाची शैक्षणिक क्षेत्रांत प्रगति व्हावयाची तर स्वतंत्र भारतांतील एक मान्य विद्यापीठ म्हणून सरकारी मान्यता या विद्यापीठास मिळाली पाहिजे म्हणून गेलीं दोनतीन वर्षे या दृष्टीने प्रयत्न चालू करण्यांत आले. कार्याची दिशा ठरवून महाराष्ट्र शासनामार्फत आवेदन मध्यवर्ती सरकारकडे रवाना करण्यांत आले. महाराष्ट्र शासनानेंहि जोरदार शिफारस केली. त्यानंतर विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यापीठाच्या कार्याचे परीक्षण करून केलेल्या सूचनेप्रमाणें विद्यापीठ अनुदान मंडळाच्या कक्षेंत येण्यासाठीं उच्च अध्यापन विभाग अधिक प्रगत करण्याची योजना ठरविण्यासाठी गुजरात विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उमाशंकर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यांत आली. समितीनें अनेक उपसमित्या नेमून उच्च अध्यापनात्मक कार्याचा विचार करून समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण या विषयांचे अभ्यासक्रम तयार केले. संस्कृतशास्त्राभ्यास विषयक चालू अभ्यासक्रमामध्यें आवश्यक बदल करण्यांत आले. महात्मा गांधी विद्यास्थान विषयक योजना विद्यापीठांत चालू करण्याचे ठरविण्यांत आले. विशेषतः या उपक्रमास गांधी स्मारक निधीतर्फे साहाय्य व सहकार्य मिळविण्यांत आले. याप्रमाणें संस्कृत-शास्त्राभ्यास, सामाजिक शास्त्रें व गांधी विद्यास्थान या विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम जून १९६९ पासून सुरु करण्याची तयारी करण्यांत आली. आंतर-भारती व भिन्नभाषाभ्यास, शैक्षणिक तत्त्वज्ञान इत्यादि विषयांचे पदवीशिक्षान्त

महाराष्ट्र-संस्कृत-परिषद्

महाराष्ट्र संस्कृत परिषद् ही संस्कृतच्या प्रसारासाठीं १९६० मध्ये स्थापन झालेली महाराष्ट्रव्यापी एक प्रमुख संस्था असून आजपर्यन्त या परिषदेची नांदेड (१९६०), मुम्बई (१९६१), नासिक (१९६३), मङ्गेशी-गोवा (१९६४) आणि प्रज्ञापुरम्-अक्कलकोट (१ मार्च १९६९) अशी पांच अधिवेशनें अनुक्रमे विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पं. भार्गवशास्त्री जोशी, विद्यावाचस्पति पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर, पं. बाळशास्त्री हरदास आणि डॉ. श्री. भा. वर्णेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या परिषदेचें सहावें अधिवेशन टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फें दि. १५ व १६ नोव्हेम्बर १९६९ हे दोन दिवस पुणें येथें भरणार असून या अधिवेशनांत महाराष्ट्रांतील सर्व संस्कृतप्रेमी जनतेनें मोठ्या प्रमाणांत सहभागी व्हावे अशी अपेक्षा आहे.

पुणें अधिवेशन-कार्यक्रम

दि. १५-११-६१, शनिवार सायं ६ —
स्वागत भाषण—म. म. प्रा. द. वा. पोतदार
उद्घाटन-भाषण—श्री. श्री. प. मराठे, पोलीस कमिशनर, पुणें.
अध्यक्ष-भाषण—पं. महाव्याघ्र गोपालाचार्य एम्. ए.

दि. १६-११-६९, रवि. दु. २-३० ते ५-३० — खुले अधिवेशन व समारोप.

संस्कृत अध्यापक संमेलनास उपस्थित रहाणाऱ्या संस्कृताध्यापकानीं रुपये ३ (तीन) आणि इतरानीं रुपये ५ (पांच) पाठवून या परिषदेची सदस्यता स्वीकारावी आणि संमेलन यशस्वीपणें पार पाडण्यांत सहकार्य द्यावें अशी प्रार्थना आहे. कळावें,

दुर्गादत्त शर्मा (स्वागत-कार्याध्यक्ष)	दत्तो वामन पोतदार (स्वागताध्यक्ष)	श्री. भा. वर्णेकर (अध्यक्ष)
श्री. धुं. कवीश्वर (सहकार्यवाह)	वसन्त अ. गाडगीळ (प्रधान-कार्यवाह)	शि. ह. धुपकर (उपाध्यक्ष)

म हा रा ष्ट्र – सं स्कृ त – प रि ष द्

महाराष्ट्र-संस्कृत-परिषद्

षष्ठाधिवेशनम् १५-१६ नोव्हेम्बर १९६९ पुण्यपत्तनम्

टिळक-महाराष्ट्र-विद्यापीठम् पुण्यपत्तनम् ३०

प्रतिनिधि-पत्रम्

मान्येभ्यः प्रधानमन्त्रिभ्यः

महाराष्ट्र-संस्कृत-परिषद्, पुण्यपत्तनम् ३०

नमो नमः ।

परिषदः अधिवेशने पुण्यपत्तने उपस्थातुं प्रेष्यते प्रार्थनापत्रम् इदम् । परिषदः सदस्यता-शुल्कं रूप्यकाः प्रेष्यन्ते । कृपया स्वीक्रियताम् ।

स्वाक्षरी

नाम

वयः

स्थलम्

श्री.

इत्येभ्यः

परिषदः सदस्यता-शुल्कं

रूप्यकाः प्राप्तम्

इति निवेदयति ।

प्रधानमन्त्री

स्वीकर्ता

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणें ३०.

संस्कृत कार्याच्या मदतीसाठी
ब्राह्मण सभा, मुंबई.

आपल्या सांस्कृतिक समितीतर्फे सहर्ष सादर करीत आहे—

卐 संगीत भर्तृहरीयम् 卐

लेखक—श्री. वा. वि. गांगल I. A. S.

डेप्युटी सेक्रेटरी, रेव्हिन्यू व फॉरेस्ट डिपार्टमेंट, महाराष्ट्रराज्य.

卐 कविवर्य, रसिकराज व नृपश्रेष्ठ भर्तृहरीच्या जीवनावर आधारलेले, दिल्ली—मुंबई—ठाणा इत्यादि शहरे गाजविलेले वृत्तपत्रांनी गौरविलेले, चाणाक्ष रसज्ञानी वाखाणलेले, चित्ताकर्षक व प्रेक्षणीय संस्कृत नाटक 卐

प्रमुख भूमिका— " पद्मश्री " नटवर्य दाजी भाटवडेकर

❀ शनिवार दि. १५ नोव्हेंबर १९६९ रोजा

रात्रौ १० वाजतां ❀

महाराष्ट्रीय मंडळ नाट्य मंदिर, टिळक रोड, पुणे ३० येथे

सन्माननीय पाहुणे मा. श्री. वसंतराव वैद्य हे उपस्थित रहाणार आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

बृहन्मुबई कार्यालय

आर्. एम्, भट हायस्कूल, परळ, मुंबई १२.

वेळ—मंगळवार ते शनिवार, सायं. ६—३० ते ८ व

रविवारी प्रातः ९ ते ११

॥ श्री ॥

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें ३०.

विद्यापीठातर्फे वर्षांतून दोन वेळां (फेब्रुवारी व ऑगस्टमध्यें) खालीलप्रमाणें परीक्षा घेण्यांत येतात.

- संस्कृत भाषा परीक्षा
- इंग्रजी भाषा परीक्षा
- गणित परीक्षा
- मराठी पाठांतर परीक्षा
- इंग्रजी संभाषण परीक्षा
- सामान्यज्ञान परीक्षा

विद्यापीठाच्या विविध परीक्षा, प्रकाशनें, संस्कृत महाविद्यालय इत्यादी चालू उपक्रमांची माहिती नियमितपणें मिळण्यासाठीं-‘टिळक महाराष्ट्र विद्यापीठ-पत्रिका’ (वा. व. १ रु.) वाचा.

अधिक माहितीसाठी लिहा-कार्यवाह,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ वाडा, पुणें २.

व पदव्युत्तर अभ्यासक्रम यथाक्रम पुढे तयार करण्यांत येतील. या सर्व उपक्रमास प्रदेश सरकारचे साहाय्य मिळत आहे. त्यामुळें विद्यापीठ मान्यतेचें उद्दिष्ट १९७१ पर्यंत साध्य होईल असें वाटतें.

श्रद्धाञ्जली–

ह. भ. प. सोनोपंत दांडेकर–

"हरिभक्तिपरायण प्रा. शंकर वामन उर्फ सोनोपंत दांडेकर यांचे मंगळवार ता. ९।७।१९६८ रोजीं पुणे येथे वृद्धापकाळाने देहावसान झाले. प्राचार्य सोनोपंत यांचा संत वाङ्मय आणि भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा व्यासंग गाढा होता. उभयविध तत्त्वज्ञानाचा सखोल, मार्मिक व तुलनात्मक अभ्यास; वारकरी संप्रदायातील त्यांची थोरवी, विशुद्ध निर्मल चारित्र्य, आदर्श आणि उज्वल देशभक्ति व नितांत परमेश्वरभक्ति, या गुणांमुळें त्यांनीं समाजाच्या सर्व थरांतील आबालवृद्धांच्या मनांत आदराचें स्थान मिळविले होते. शिक्षण प्रसारक मंडळीचे आजीव सेवक म्हणून १९२० सालापासून पुढें तीस वर्षेंपर्यंत त्यांनीं केलेलें शैक्षणिक कार्य सर्वश्रुत असेंच आहे. या कालांत उत्तम प्राध्यापक, शिस्तप्रिय प्राचार्य, कर्तव्यदक्ष व चारित्र्यसंपन्न अधिकारी, व्यासंगी प्रवक्ते व ग्रंथकार म्हणून शिक्षणक्षेत्रांत त्यांनीं महत्त्वपूर्ण कामगिरी केली. हे कार्य चालू असतानाहि वारकरी संप्रदायातील त्यांचे कार्य कीर्तनप्रवचनादि द्वारा अव्याहत चालू होते. ज्ञानेश्वर चरित्र, ईश्वर–दर्शन, यांसारखे ग्रंथ व नियतकालिकांतील त्यांचे लेखन समाजाची नैतिक उंची वाढविण्यास उपकारक ठरले. आपल्या निःस्पृह व निरंतर कार्यकर्तृत्वानें प्रचंड लोकसंग्रह करणारा, तत्त्वज्ञानी संत आणि आदर्श देशभक्त म्हणून जनमानसांत त्यांचें स्थान चिरंतन झालें आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे संतवाङ्मयाच्या अभ्यासास विशेष चालना मिळावी यासाठी त्यांनी तयार केलेली संत वाङ्मय परीक्षा विषयक योजना विद्यापीठानें स्वीकारली. या योजनेमुळें त्यांचा विद्यापीठाशी विशेष संबंध आला. तथापि सदर योजना कार्यवाहीत आलेली पाहाण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले याबद्दल हळहळ वाटते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रांतील एक उच्च कोटीचा तत्त्वज्ञ संत व निष्ठावान् देशभक्त नाहीसा झाल्यामुळें देशाची अपरिमित हानि झाली आहे.

वेदवित्कुलशेखर पं. श्री. दा. सातवळेकर.

शतायु, वेदमहर्षि, वेदवित्कुलशेखर पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांचे ३१ जुलै १९६८ रोजी पारडी येथें वयाच्या १०१ वर्षीं निधन झाले. त्यांच्या मृत्यूमुळें भारताच्या प्राचीनकालीन महर्षीचे प्रतीक नाहीसे झाले आहे. भारतीय संस्कृतीची यावज्जीव चिन्ता वहाणारा थोर राष्ट्रभक्त, वेदांची शिकवण आत्मसात केल्यानेच विजिगीषु भारत राष्ट्राची निर्मिति होईल असा दृढ विश्वास असल्यामुळें

वेदविद्येच्या प्रसारासाठी आयुष्याचा प्रत्येक क्षण वेचणारा थोर कर्मयोगी, जीवन निरामय आणि दीर्घायु करण्यासाठी स्वतःच्या आचरणाने योगासनांचा पुरस्कार करणारा निष्ठावन्त योगाभ्यासी, आणि भारतात व भारताबाहेर सतत संस्कृत भाषेचा प्रसार करणारा खंदा संस्कृत प्रचारक या विविध अंगांनीं त्यांचे जीवन कर्मसमृद्ध, धर्मप्राण आणि संस्कृतप्रचुर बनलें होतें. सतत पाच तपे वेदवाङमयाचा प्रचार करून त्यांनीं चारशेहून अधिक लहानमोठे ग्रन्थ प्रकाशित केले. कोलगांव (सावन्तवाडी) ते मुंबई, हैद्राबाद, हरिद्वार, पीठापुरम्, कलकत्ता, लाहोर, औन्ध आणि शेवटी पारडी या भारताच्या कानाकोपऱ्यात परिस्थितिवशात् सतत स्थानान्तर करण्याचे आलेले प्रसंग ही इष्टापत्ती मानून मोठ्या धैर्याने प्राप्त प्रसंगांना तोंड देऊन त्यांनीं आपलें जीवनकार्य सतत चालविले. भारताचा पुरुषार्थ जागृत करून राष्ट्राला स्वातंत्र्यप्रवण, बलवत्तर आणि विजिगीषु करण्यासाठी ते अहर्निश प्रयत्नशील असत.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्याबद्दल त्यांना अत्यंत आस्था व आपुलकी होती. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी १ मे १९६७ रोजी विद्यापीठाने खास पदवीदान समारंभ करून त्यांना "वेदवित्कुलशेखर" ही पदवी अर्पण केली.

वेदविद्येच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी अहर्निश झटणारा हा महापुरुष कालवश झाल्यामुळें भारताची व संस्कृत विद्येची मोठी हानि झाली आहे.

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

भारतीय संस्कृतीचे प्रखर पुरस्कर्ते, संस्कृत विद्येचे थोर उपासक, महाराष्ट्र संस्कृत परिषदेचे अध्यक्ष म. म. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास ११ ऑगस्ट १९६८ रोजी वयाच्या ५० वर्षी अल्पकाली आजाराने नागपूर येथे निधन पावले.

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास हे थोर साहित्यिक, पट्टीचे वक्ते, निष्ठावन्त प्रचारक, श्रीदक्षिणामूर्तीचे निःस्सीम उपासक, आणि यशस्वी संघटक म्हणून भारतात सर्वत्र प्रख्यात होते. त्यांच्या अमोघ वक्तृत्वाने हजारोंच्या संख्येने श्रोतृवृन्द मंत्रमुग्ध होत असे. रामायण, महाभारत, वेद, श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज, आर्य चाणक्य इ. विषयांवर त्यांनीं पुण्यांत सतत १४ वर्षे प्रतिवर्षी व्याख्यानमाला गुंफली आणि आपल्या प्रतिपाद्य विषयांना ग्रंथरूप दिलें.

त्यांच्या अकाली निधनामुळें हिंदुधर्म व संस्कृत विद्या यांचा खंदा पुरस्कर्ता आणि विद्याव्रती, क्रियाशील पण्डित नाहीसा झाला आहे.

श्रीमान् मुकुंदलाल पित्ती

टि. म. विद्यापीठाच्या श्रीबालमुकुंद संस्कृत महाविद्यालयाचे एक आश्रयदाते व टि. म. विद्यापीठाच्या विविध कार्यांचे हितचिंतक श्रीमान् शेठ मुकुंदलाल

बन्सीलाल पित्ती यांचे ऋषिपंचमी ता. २८–८–६८ रोजी दीर्घकालीन आजारानंतर निधन झाले.

श्रीमान् शेठ मुकुंदलाल यांचा विद्यापीठाचे कार्याशीं सुमारें २२ वर्षांपूर्वी संबंध आला व विद्यापीठाच्या माध्यमाने प्राचीन न्यायमीमांसादि शास्त्र व संस्कृत भाषा यांचे पोषण होत असलेले पाहून त्यांनी टि. म. विद्यापीठास बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयाकरितां अप्रार्थित भरीव देणगी देऊन त्या कार्यास चालना दिली. त्यांच्या सुविद्य व सुसंस्कृत धर्मनिष्ठ पत्नी श्रीमती राजकुमारीदेवी पित्ती यांनीहि विद्यापीठाच्या विविध सांस्कृतिक कार्यांत स्निग्धपणें अनेक प्रकारानें हातभार लाविला आहे. छात्रगण व अध्यापक यांच्याकरिता वेळोवेळी अप्रार्थित मदतहि करण्यात पित्ती घराणे तत्पर असे. श्री. मुकुंदलाल यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांची मोठी हानि झाली असून विद्यापीठाचा एक उदार आश्रयदाता व संस्कृत विद्येचा पुरस्कर्ता नाहीसा झाला आहे.

प्रभाकरपंत कोरगांवकर

टि. म. विद्यापीठाचे एक उदार आश्रयदाते श्री. प्रभाकरपन्त गोविन्द कोरगांवकर हे घटप्रभा येथें दि. १७–९–६८मंगळवार रोजीं वयाच्या ६० व्या वर्षी आकस्मिक रीत्या निधन पावले.

श्री. प्रभाकरपंत यांनी आपले दानशूर वडील श्रीमान् गोविन्दराव कोरगांवकर यांच्या निधनानंतर १० लाख रुपयांचा " कोरगांवकर विश्वस्त निधि " स्थापन केला. या निधीने महाराष्ट्रांतील अनेक सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक संस्थांना आणि कार्यकर्त्यांना आधार देऊन त्यांचे पोषण केले. टिळक विद्यापीठानें १९४६ मध्यें मराठीतून शास्त्रीय ग्रंथ प्रकाशनाचे कार्यास प्रारंभ केला. त्यावेळीं या कामासाठीं विद्यापीठास भरीव देणगी देऊन त्यांनीं चांगली चालना दिली. या निमित्ताने विद्यापीठाशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. विद्यापीठाच्या कामाबद्दल त्यांस अत्यंत जिव्हाळा वाटत असे. मराठीतून शास्त्रीय वाङ्मय प्रसिद्ध व्हावे यासाठीं अनेक व्यक्तींना व संस्थांना त्यांनी मदत केली. त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र एका अबोल, प्रसिद्धिपराङ्मुख अशा सात्त्विक प्रवृत्तीच्या थोर सर्वोदयी समाजसेवकाला मुकला आहे.

वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे–

टिळक महाविद्यालयातील माजी अध्यापक व महाराष्ट्रातील ख्यातनाम आयुर्वेद विद्वान् वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे यांचे दि. १२।१०।६८ रोजीं वयाच्या ८६ व्या वर्षी पुणें येथें वृद्धापकाळानें निधन झाले. वैद्यपंचानन हे लोकमान्य टिळकांचे निस्सीम उपासक होते. टिळकांच्या प्रसिद्ध चतुःसूत्रीचे निष्ठावंत प्रचारक म्हणून त्यांनीं काम केले. शुद्ध आयुर्वेदाला समाजांत मानाचे स्थान

मिळवून देणारांमध्यें त्यांचा विशेष निर्देश करावा लागेल. गाढा अभ्यास असूनहि आधुनिक औषधोपचारांची सांगड आयुर्वेदीय शास्त्राशी घालण्याचा त्यांचा प्रयत्न असे. वैद्यकपत्रिका या मासिक पत्रिकेचे ते अनेक वर्षे संपादक होते.

अनेक सार्वजनिक संस्थांशी त्यांचे निकटचे संबंध होते. त्यांच्या निधनानें जुन्या पिढीतील एक निष्ठावंत विद्वान् नाहीसा झाला आहे.

श्रीबालमुकुन्द संस्कृत महाविद्यालय–

वृत्तांतवर्षी शास्त्र–विभाग व संस्कृतभाषा विभाग हे दोन विभाग यथापूर्व चालू होते. शास्त्रविभागांत शास्त्रपारगत २, शास्त्रविशारद १, शास्त्रप्रथमा ८, शास्त्रप्रवेश ७ अशी एकूण १८ नांवे पटावर होती. पैकीं सात विद्यार्थी १९६८ नोव्हेंबरमध्यें टिळक महाराष्ट्र विद्यापीठानें घेतलेल्या शास्त्रप्रवेश परीक्षेस बसले व त्यांपैकीं तीन उत्तीर्ण झाले.

संस्कृत भाषा वर्ग एप्रिल १९६८ व सप्टेंबर १९६८ मध्यें सुरू झाले. पहिल्या एप्रिल (१९६८) ते ऑगस्ट (१९६८) ह्या सत्रांतील वर्ग संख्या इत्यादि विवरण पुढीलप्रमाणें आहे–

	वर्ग	दाखल	अर्ज भरले	उपस्थित	उत्तीर्ण
प्रवेश	४	३१३	२२५	२१७	१९४
प्रथमा	३	१६७	१३२	१२६	१२०
द्वितीया	२	११०	१०८	१०४	९१
तृतीया	१	५४	३२	३०	२५
भाषाभिज्ञ	१	१५	७	६	५
	११	६५९	५०४	४८३	४३५

दुसऱ्या सत्रांतील (सप्टेंबर १९६८ ते फेब्रुवारी १९६९) संस्कृतभाषा वर्गासंबंधीं विवरण–

	वर्ग	दाखल	अर्ज भरले	उपस्थित	उत्तीर्ण
प्रवेश	३	१७८	११०	१०८	९८
प्रथमा	५	२३७	१७१	१७०	१५३
द्वितीया	३	१६३	८७	८३	५८
तृतीया	१	५७	३१	२९	२२
भाषाभिज्ञ	१	१३	५	४	४
	१३	६४८	४०४	३९४	३३५

मुक्तद्वार संस्कृत ग्रंथालय–

विद्यालयाचें मुक्तद्वार संस्कृत ग्रथालय यथापूर्व चालू आहे. विद्यालयाच्या ग्रंथालयांतील ग्रंथसंख्या वृत्तांतवर्षी आरंभास ७१६९ होती व शेवटी ७४४० इतकी झाली. वृत्तांतवर्षी २७१ ग्रंथांची भर झालेली आहे. ग्रंथालयाचा व अभ्यासिकेचा उपयोग अनेक अभ्यासूनीं केला. पंचवीस वाचकांची ग्रंथालयांत बसण्याची सोय आहे. गंथालयांतील पुस्तकांचा उपयोग ग्रंथालयाच्या अभ्यासिकेमध्येंच करतां येतो. वृत्तांत वर्षी वाचकांची सरासरी उपस्थिती ५० होती.

महाविद्यालयांतील गणेशोत्सव प्रतिवर्षाप्रमाणें विद्यार्थ्यांनी साजरा केला. उत्सवामध्यें प्रा. धडफळे, श्री. अ. ज. करंदीकर, श्री स. शि. भावे यांचा व्याख्यानें झाली. विद्यार्थी विद्यार्थिनींचें विविध गुणदर्शनाचें कार्यक्रम झाले. आरती, मंत्रपुष्प, गणपत्यथर्वशीर्षपाठ इत्यादि नित्य कार्यक्रम झाले.

संस्कृत–विद्यालयाचा १९ वा वाढदिवस लखनौ विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु डॉ. अय्यर यांच्या भाषणाने साजरा झाला. भर्तृहरीच्या वाक्यपदीयांतील वाक्य-कल्पना ह्या विषयावर त्यांचे भाषण झाले.

संस्कृत विविध स्पर्धा–

वृत्तांत वर्षातील संस्कृत विविध स्पर्धा दि. ४, ५ व ६ जानेवारी १९६९ हे तीन दिवस झाल्या. प्रौढ गटामध्ये चार संस्थांतील ३५ स्पर्धकांनीं व बालगटा-मध्ये अकरा संस्थांतील १६७ स्पर्धकांनी सात स्पर्धाविभागांमध्यें भाग घेतला होता. ह्या स्पर्धांमध्यें यशस्वी झालेल्या स्पर्धकांना पारितोषिकें देण्याचा समारंभ पुणे आकाशवाणी केंद्राधिकारी श्री. भास्करराव भोसले यांच्या अध्यक्षतेनें प्रजासत्ताक-दिनी (२६ जानेवारी १९६९) साजरा झाला.

वृत्तांत वर्षी संस्कृत महाविद्यालयाला महाराष्ट्र सरकारकडून रु. १२२३२–५० अनुदान मिळाले. विद्यालयाची एकूण जमा रु. १३८१५-५६ झाली असून एकूण खर्च ३३९४४–०८ झालेला आहे. तूट भरून काढण्यासाठीं टिळक महाराष्ट्र विद्यापीठाकडून रु. २०१२८-५२ इतकी रक्कम घ्यावी लागलेली आहे.

ग्रंथसंशोधन प्रकाशन मंडळ

वृत्तांत वर्षी देवीकोष भाग दुसरा पृ. ५२५ व भाग तिसरा पृ. ५५७ हे दोन भाग प्रकाशित झाले. दुसऱ्या भागाचा प्रकाशन समारंभ दि. ८ एप्रिल १९६८ रोजीं त्यावेळचे नभोवाणीमंत्री श्री. के. के. शहा यांचे हस्तें पुण्यास झाला. तिसऱ्या भागाचे प्रकाशन मुंबईस २५ जानेवारी १९६९ रोजी महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळीं महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे ह्यांचे मुख्य वक्ते म्हणून भाषण झाले. त्यांनीं आपल्या भाषणामध्यें देवीकोषासंबंधी प्रशंसोद्गार काढले.

रसगंगाधर तिसरा खंड, वाक्यपदीय दुसरे कांड, सर्वदर्शन संग्रह ह्या ग्रंथाचे भाषान्तर विवरण वगैरे काम चालू होते. (चालू सालीं त्यांच्या मुद्रणास प्रारंभ होईल.) वृत्तांत सालो ग्रंथसंशोधन प्रकाशनासाठी महाराष्ट्र सरकारकडून रुपये ३१२२-०० अनुदान मिळाले व रु. १२०११-५३ इतका खर्च करावा लागला. तूट भरून काढण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाकडून रु. ८८८९-५३ इतकी रक्कम घ्यावी लागली आहे.

परीक्षा –

विद्यापीठाच्या संस्कृत, गणित, इंग्रजी इत्यादि परीक्षा माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये त्या त्या विषयांची गोडी उत्पन्न करण्यास उपकारक ठरल्या आहेत. मराठी पाठांतर व सामान्य ज्ञान विषयाच्या परीक्षांचीहि वाढ क्रमशः होत आहे.

पाठ्यपुस्तक प्रकाशन–

खालीलप्रमाणें पाठ्यपुस्तकांच्या आवृत्ती वृत्तांतवर्षांत छापण्यांत आल्या—

पुस्तक		आवृत्ति	प्रती
सुबोध संस्कृत प्रवेश	...	८ वी	१०,०००
संस्कृत द्वितीय कुसुमम्	...	६ वी	१०,०००
संस्कृत तृतीयं कुसुमम्	...	३ री	३,०००
संस्कृत चतुर्थं कुसुमम्	...	२ री	२,०००
लोकमान्य इंग्लिश प्रायमर	...	९ वी	१०,०००
लोकमान्य रीडर १ ले	...	९ वी	७,०००
लोकमान्य ग्रामर १ ले	...	९ वी	७,०००

महाराष्ट्र ग्रामकोश मंडळ –

महाराष्ट्र ग्रामकोशाचे २ मानचिन्हसंग्रह व ग्रामसुचि हे दोन खंड प्रकाशित झाले. अनेकांनी अनुकूल अभिप्राय पाठवून या ग्रंथाच्या प्रकाशनाबद्दल विद्यापीठास धन्यवाद दिले. उत्पादनांच्या साधनांचा तिसरा भाग तयार होत आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पत्रिका –

विद्यापीठाच्या विविध उपक्रमांची माहिती जनतेसमोर ठेवण्यास या पत्रिकेचा चांगला उपयोग होतो. कांहीं प्रौढ शैक्षणिक लेखहि पत्रिकेंतून प्रसिद्ध करण्यांत आले. तसेंच विविध संस्कृत स्पर्धांमध्यें पारितोषिकार्ह ठरलेल्या उमेदवारांची संस्कृत भाषणें, अध्यक्षीय भाषणांचे सारांश, परीक्षांचे निर्णय, आगामी परीक्षांचे दिवस, उत्सवसमारंभाबाबत माहिती व शैक्षणिक कार्याचे इतिवृत्त पत्रिकेंतून वेळोवेळी प्रसिद्ध करण्यांत आले. विद्यापीठ पत्रिकचा संमेलन विशेषांक मे १९६८ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. विद्यापीठाने आरंभिलेल्या नवीन उपक्रमांची व सुवर्ण महोत्सवी योजनांची सविस्तर माहिती त्या अंकांत व जून १९६८ च्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आली.

चित्रकला स्पर्धा –

चित्रकार पिंपळखरे चित्रकला स्पर्धा प्रतिवर्षप्रमाणें डिसेंबरमध्यें घेण्यांत आल्या. स्पर्धांमध्यें यशस्वी झालेल्या उमेदवारांस पिंपळखरे निधीच्या व्याजांतून पारितोषिकें देण्यांत आली.

सुवर्णमहोत्सवग्रंथप्रकाशन –

विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सव ग्रंथमालेची कार्यवाही करण्यासाठीं डॉ. रा. ग हर्षे यांची कार्यकारी संपादक म्हणून नियुक्ति करण्यांत आली. त्यांचे मदतनीस म्हणून श्री. सा. तु. याज्ञिक यांची योजना करण्यांत आली. विद्यापीठाच्या पदवीधराना व इतर लेखकाना विनंति करून अपेक्षित ५० पुस्तकांची व लेखकांची नांवे निश्चित करण्यांत आली. १९७१ पर्यंत ग्रंथ प्रकाशित व्हावयाचे असल्यामुळें निश्चित झालेल्या ५० नांवात लेखकांत व विषयांतहि बदल होण्याची शक्यता आहे. विजयादशमीच्या मुहूर्तावर सरदार ईश्वरसिंघ ठाकूर यांचे शीख-पंथदर्शन व श्री. य. न. केळकर यांचे मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे व डॉ. मा. श्री. अणेकृत तिलकयशोऽर्णव संस्कृत महाकाव्य खंड १ ला या तीन ग्रंथांच्या मुद्रणास प्रारंभ करण्याचा समारंभ पुणें विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. हरिभाऊ पाटसकर यांच्या अध्यक्षतेनें झाला. त्यावेळीं विद्यापीठानें सुवर्णमहोत्सवानिमित्त प्रकाशित करण्याचे ठरविलेल्या पन्नास ग्रंथांची रूपरेषा त्यांचे विषय व लेखक यासंबंधीं विशेष माहिती देणारी डॉ. हर्षे, आचार्य वि. प्र. लिमये, श्री. शंकरराव आगाशे इत्यादि वक्त्यांची भाषणें झाली. शीखपंथदर्शन हे पुस्तक छापलें जाऊन गेल्या वर्षप्रतिपदेस समारंभ-पूर्वक महाराष्ट्रराज्याचे शिक्षणमंत्री नामदार श्री. मधुकरराव चौधरी यांच्या अध्यक्षतेनें प्रकाशित करण्यांत आले.

महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या अध्यक्षांची भेट घेऊन त्यांस या कामाची माहिती देण्यांत आली त्यांनीं याकामी साहाय्य देण्याचे मान्य केले.

संकल्पाप्रमाणें सन १९६९ एप्रिल ते १९७० मे या अवधीत आणखी १५ ग्रंथ प्रकाशनासाठी तयार करून घेणें आवश्यक आहे. त्यादृष्टोने खटपट चालू आहे.

तिलकयशोऽर्णव प्रकाशन

विद्यापीठाचे माजी कुलपति लोकनायक डॉ. मा. श्री. उर्फ बापूजी अणे यांनीं

टीप — (मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे हे जुलै १९६९ मध्यें महाराष्ट्रराज्याचे महसूलमंत्री नामदार श्री. बाळासाहेब देसाई यांचे हस्तें व तिलक-यशोऽर्णव भाग १ ला केन्द्रिय शिक्षणमंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव याच्या हस्तें ८ जून १९६९ रोजीं प्रकाशित झालें.)

संस्कृतमध्ये काव्यमय लिहिलेले लोकमान्यांचे चरित्र " तिलकयशोऽर्णव " विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी ग्रंथमालेचे पहिले पुष्प म्हणून विद्यापीठाने प्रकाशित करण्याचे ठरविले. त्यासाठी एक स्वतंत्र प्रकाशन समिति नेमली.

या समितीमध्यें मान्यवर अशा अनेक व्यक्तींचा समावेश करण्यांत आला. तसेच कुलगुरु म. म. पोतदार यांचे अध्यक्षतेने एक कार्यकारी मंडळ व डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या अध्यक्षतेने सदर ग्रंथाचे संपादन करण्यासाठी संपादक मंडळ स्थापन करण्यांत आले.

तिलकयशोऽर्णव हा ग्रंथ तीन भागांत प्रकाशित करण्याचे ठरले असून मार्च ६९ अखेर सदर ग्रंथाचा पहिला भाग छापून तयार करण्याचे संपादक मंडळाने ठरविले. मध्यवर्ती शिक्षण मंत्री डॉ. राव यांचे हस्ते या पहिल्या भागाचे प्रकाशन करण्याचे ठरविण्यांत आले.

राहिलेल्या दोन्ही खडांचे प्रकाशन १ ऑगस्ट १९७० पर्यंत पुरे करण्याच्या दृष्टीने संपादक मंडळ आत्मीयतेने काम करीत आहे.तिलकयशोऽर्णवाच्या प्रकाशनासंबंधी सर्व योजना पार पाडण्याचें काम संयोजक श्री शंकरराव आगाशे हे परिश्रमपूर्वक करीत आहेत. ग्रंथप्रकाशनासाठी आगाऊ ग्राहक व देणगी मिळून रुपये ११,८२४–०० जमा झाले आहेत.

सुवर्णमहोत्सव समिति–

१९६८–६९ या वर्षांत सुवर्णमहोत्सव निधीच्या कामाला सुरुवात करण्यांत आली. मुंबईत निधी जमविण्याचा विशेष प्रयत्न करावा असे ठरवून माननीय श्री. एल. एम. नाडकर्णी, चेअरमन, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट यांनी उद्योगपतींची एक सभा बोलाविली होती.त्यांत अखिल भारतीय निधी समिती नेमावी व नंतर मुंबई समिति नेमावी व त्या धोरणाने जिल्हा समित्या नेमाव्या असा विचार झाला.

या निधीस बृहन् महाराष्ट्राचेही सहाय्य मिळवावे. या धोरणाने नवी दिल्ली येथील बृहन् महाराष्ट्र परिषदेचे सेक्रेटरी श्री. मुळगुंद यांना संस्थेस भेट देण्याबद्दल विनंती केली होती. त्याप्रमाणें त्यांनी भेट दिली व संस्थेच्या अभ्यागत अभ्यासगृह या कार्यास बृहन् महाराष्ट्रातर्फे मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले हैद्राबादेस बृहन्महाराष्ट्र परिषद झाली. तिला कार्यवाह श्री. धुपकर, श्री. कवीश्वर व श्री. के. ह. खाडीलकर गेले होते.

प्रचारकार्य

विद्यापीठातर्फे चालू असलेल्या विविध परीक्षांचा उपयोग विद्यार्थीवर्गांत त्या त्या विषयांचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति वाढविण्याकडे कसा करून घेता येईल. याचा विचार करण्यासाठी संस्कृत, इंग्रजी व गणित या विषयांच्या अध्यापकांच्या बैठकी पुणें, मुंबई येथे भरविण्यांत आल्या. शिक्षकांनी आपापले अनुभव

सांगून विद्यार्थीवर्गास अभ्यासाकडे प्रवृत्त करण्यास या परीक्षांचा उपयोग करता येतो याची चर्चा मोकळेपणाने केली.

शैक्षणिक परिसंवाद

महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या श्वेतपत्रिकेसंबंधी शैक्षणिक चर्चा घडवून आणण्यासाठी मुंबई, कोल्हापूर आणि पुणे या तीन ठिकाणी परिसंवाद विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आले. नामवंत शिक्षणतज्ज्ञ मुख्याध्यापक व अध्यापक वर्ग यांनीं या उपक्रमांचे स्वागत केले. विशेषतः संस्कृत, इंग्रजी, गणित व राजभाषा या विषयांबाबत विद्यापीठाच्या विविध उपक्रमांस पोषक असे विचार परिसंवादात व्यक्त झाले व विद्यापीठाने प्रारंभापासून स्वीकारलेले शैक्षणिक धोरण राष्ट्रीय वृत्तीच्या जोपासनेस उपकारक व मार्गदर्शक ठरले. श्वेतपत्रिकेवर सर्वप्रथम चर्चा घडवून आणून विद्यापीठाने या विषयास मोठी चालना दिली.

सुवर्ण महोत्सव योजना व शैक्षणिक परिसंवाद यासंबंधी प्रचारासाठी योजनाबद्ध कार्यक्रम आखून ते योग्य प्रकारे पार पाडण्यांत विद्यापीठाचे प्रचारक श्री. श्री. धुं. कवीश्वर यांनीं पुष्कळ मेहनत घेतली व ते कार्यक्रम यशस्वी केले. या कामी मुंबई कार्यालयांतील वैभव मित्रमंडळाचे कार्यकर्ते यांचेहि सहकार्य चांगले मिळाले. श्री. धुं. कवीश्वर यांनीं नागपूर, मराठवाडा, गोवा या भागांत जाऊन विद्यापीठाच्या परीक्षादि कार्याचा प्रचार केला.

टिळक विद्यापीठ मुद्रणालय–

नोव्हेंबर १९६४ मध्यें टिळक विद्यापीठाने आपला छापखाना स्थापन केला. आरंभी हा छापखाना गावांतील विद्यापीठ वाड्यांत होता. जून १९६८ मध्ये तो टिळक विद्यापीठ नगरांतील नवीन जागेत हालविण्यात आला आहे. या छापखान्यांत पूर्वी छपाईची दोन ट्रेडल यंत्रे होती. अहवालाच्या वर्षी एक सिंगल–डेमी देशी बनावटीचें घेण्यांत आले या मशीनचें काम जुलै १९६८ पासून व्यवस्थितपणें चालू झाले हे मशीन घेतल्यावर वैदिक संशोधन मंडळाचे ग्रंथ छपाईचें काम करणें शक्य झालें. सुवर्णमहोत्सव ग्रंथ प्रकाशनापैकी तिलकयशोर्णव, मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे व शीखपंथ दर्शन हा तीन पुस्तकें विद्यापीठ मुद्रणालयात छापली गेली. नवीन टाईप घ्यावा लागला व त्यामध्यें बरीच रक्कम गुंतवावी लागली सध्या छापखान्यांत १९ कामगार आहेत त्याशिवाय कंत्राटी कंपोझिंग खात्यामध्यें ५–६ कामगार असतात. शैक्षणिक संस्था, व्यापारी कंपन्या यांचे काम मिळवून छापखान्यांस आर्थिक स्थैर्य आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

छापखान्याचे कामावर लक्ष ठेवण्यासाठीं एक व्यवस्था समिति असून तिची अहवालवर्षी पुनर्रचना करण्यांत आली. समितीचे चिटणास म्हणून श्री. त्रि. ना. धर्माधिकारी व अध्यक्ष श्री. स. के. भावे यांची निवड झाली. श्री. गो. प. नेने, श्री. के. ह. खाडीलकर, श्री. द. दि. गागल, श्री. शि. ह. धुपकर व श्री. वि. अ. पटवर्धन हे सभासद आहेत. श्री. वि. अ. पटवर्धन हे सन्मान्य व्यवस्थापक म्हणून काम पहात होते.

अहवालाचे वर्षी सुमारें रु. ६२००० च्या कामाची बिलें झाली. शिवाय रु. ८७०० काम चे अपूर्ण स्थितींत आहे. एक मोठे सिलिंडर मशीन घेण्यासंबंधी

आवश्यक व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यामुळें पुढील वर्षांत अधिक कामे करतां येतील व छापखाना स्वयंपोषित होईल अशी अपेक्षा आहे.

भारतीय धर्म तत्त्वज्ञान संस्कृति मंडळ–

मंडळाचे ग्रंथालय गतवर्षी वै. सं. मंडळाच्या जागेत नेण्यात आले आहे. ग्रंथालयाचा उपयोग निवडक वाचक वर्गास होतो. आचार्य वि. प्र. लिमये यांनी वेदार्थ विचाराचा वर्ग वै. सं. मंडळाच्या जागेत चालू केला.

थोरांच्या भेटी–

वृत्तांत वर्षात पुढील विशेष व्यक्तींनीं विद्यापीठास भेट देऊन विद्यापीठाच्या कार्यासंबंधी संतोष व्यक्त केला व भावी योजनांसंबंधी उपयुक्त सूचना देऊन मार्गदर्शन केले. लोकसभेचे उपसभापति श्री. र. के. खाडिलकर, गुजरात विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उमाशंकर जोशी, पुणें विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. ह. वि पाटसकर श्री. सी रा. तावडे, आचार्य प्र. के. अत्रे, लखनौ विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु डॉ. सुब्रह्मण्य अय्यर, पुणें आकाशवाणी केंद्राचें प्रमुख श्री. भास्करराव भोसले.

उत्सव समारंभ

सं. म. विद्यालयाचा वर्धापन समारंभ, डॉ. सुब्रह्मण्यम् अय्यर यांचे हस्ते ता. ३–११–६८ रोजी झाला. त्यावेळी पं. कवीश्वरशास्त्री यांस संस्कृत अध्यापक म्हणून प्रा. का. वा अभ्यंकर यांस संस्कृत पण्डित म्हणून भारत सरकारने गौरविल्याबद्दल त्यांचा सत्कार मा. कुलगुरुच्या हस्ते करण्यांत आला. संस्कृतस्पर्धांचा पारितोषिक समारंभ दि. २६–१–६९ रोजी श्री. भास्करराव भोसले यांचे हस्ते पार पडला. विद्यापीठाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन समारंभ महाराष्ट्र राज्याचे नगरविकास मंत्री नामदार पु. ग. खेर यांचे हस्ते हस्ते दिनांक २–२–६९ रोजीं झाला.

वैदिक संशोधन मंडळ–

मंडळाने हाती घेतलेल्या विविध चालू संशोधन प्रकाशन योजनांमध्ये खालीलप्रमाणें प्रगती झाली आहे.

वेदविभाग– कृष्णयजुर्वेद तैत्तिरीय संहिता–

सायणभाष्य व भट्टभास्करभाष्य यांसह प्रकाशित करावयाच्या पहिल्या खंडाची २४० पृष्ठे मार्च १९६८ अखेर छापून झाली होती. वृत्तांतवर्षी याच खंडाची आणखी २२४ पृष्ठें छापून झाली.

वृत्तांतवर्षी तैत्तिरीय संहितेच्या दुसऱ्या खंडातील काण्ड २ व ३ वरील भाष्यांतील संदर्भ तपासले व स्थूल मानानें, नमूद झालेल्या पाठभेदांचा अभ्यास करणें इत्यादि कामें झाली.

श्रौतकोश– खण्ड २ (संस्कृत विभाग)–

या खंडामध्यें अग्निष्टोमादि सप्त सोमसंस्था, एकाह, राजसूय यासंबंधी मन्त्र–ब्राह्मण आणि बौधायन सूत्र यांचा समावेश व्हावयाचा आहे. मार्च १९६८ अखेर या खंडाची एकूण ५६० पृष्ठें छापून झाली होती. वृत्तांत वर्षी आणखी ९६ पृष्ठें छापून झाली. शब्दांची सूची तयार करण्याचें काम सुरु करण्यांत आले.

श्रौतकोश खंड २ (इंग्रजी विभाग)–

या विभागामध्ये द्यावयाच्या श्रौतसूत्रांच्या इंग्रजी अनुवादाचें काम डॉ. रा. ना. दांडेकर यांचेकडे सोपविण्यांत आले आहे. त्यांनीं तयार करून दिलेल्या अनुवादाचे अवलोकन वृत्तान्त वर्षीं चालू होतें.

कौशिक सूत्र–कौशिकसूत्राची चिकित्सित आवृत्ति तयार करण्याचें काम मंडळानें स्वीकारलें असून वृत्तांतवर्षी या कामांत कांहीं प्रगति झाली. कौशिक-सूत्रावरील भाष्याच्या हस्तलिखिताची मायक्रोफिलम मिळविण्यांत आली आहे हस्तलिखिताची एकूण १३६ पृष्ठें असून ती सर्व लिहून घेण्यांत आली व त्यांचा अभ्यास करण्याचें काम वृत्तांत वर्षी चालू होतें.

अवेस्ता विभाग– देवनागरी अवेस्ता विभाग ३–

हा भाग देवनागरी अवेस्ता प्रकाशनाचा अंतिम भाग होय. वैदिदाद प्रकरण छापून पूर्ण झाले आहे. तथापि कांहीं स्फुट प्रकरणें– अफिगान, जिरंगिस्तान, अओगमइदे. तेहमुरस वगैरे या भागांत समाविष्ट होणें आवश्यक आहे. त्याच्या संपादनाचे काम थोडेफार झालें. हा भाग सुमारे ३५० पृष्ठांचा होईल. त्यांपैकीं १९२ पृष्ठें छापून झाली आहेत.

अवेस्ता प्रवेशिका–अवेस्तामधील निवडक वेच्यांचा संग्रह. इंग्रजी अनुवाद, व्याकरण, व्युत्पत्ति दर्शक व विशेष महत्व असलेल्या शब्दांवरील टीपा यांचा समावेश या प्रवेशिकेंत अतर्भूत आहे.

अवेस्ता कोश–

व्युत्पत्तिसह अवेस्ताकोश तयार करण्याचें काम चालू आहे मेहेर यश्त या प्रकरणाचें जेवढे अध्यापन झालें आहे, त्या भागांतील शब्दांचे अर्थ व त्यांचे अन्य ठिकाणीं येणारे संदर्भ तपासण्याचें काम चालू आहे तसेंच पांच गाथांपैकीं अहुनवहती गाथा कोशाचे दृष्टीनें वाचण्यांत आली. अवेस्ताशब्द–विषयक चर्चा, टिप्पणी वगैरे अवलोकन करण्याचे काम, तसेंच कोशविषयक संदर्भ ग्रंथांची जुळणी करण्याचें काम चालू ठेवले आहे.

अवेस्ता वर्ग–

वेदांच्या अध्ययनाला अवेस्ता अभ्यासाची जोड दिली तर दोहोंचेही ज्ञान एकमेकांना पूरक ठरते. अवेस्ता अध्ययनाचें हे महत्त्व जाणून मंडळानें अवेस्ता-वर्गाचा उपक्रम सुरू केला आहे. हे वर्ग मंडळांत दर पंधरवड्यास घेतले जातात. मंडळांतील व पुणें येथील इतर संशोधन संस्थांतील विद्वान यांना या वर्गाचा फायदा होतो. अवेस्ता विभागाचे सन्मान्य सचालक प्रा. मा. फ. कांगा या वर्गाचे संचालन करतात. तसेंच पुणें विद्यापीठाच्या संस्कृत प्रगत अभ्यास केंद्रातील अभ्यासकांना सोयीचे व्हावें म्हणून तेथेंही नियमितपणें वर्ग घेतले जातात.

ग्रंथालय–

चालू वर्षी ग्रंथालयामध्यें एकूण १२० ग्रंथ दाखल झाले. त्यांपैकीं १४ ग्रंथ मंडळानें विकत घेतले व १०६ ग्रंथ मंडळास भेट वा देणगी म्हणून मिळाले. वृत्तांत वर्षाअखेर मंडळाच्या ग्रंथालयांत एकूण ६०३२ ग्रंथ दाखल झाले आहेत. याशिवाय नवसारीचे पारसिक समाजांतील सुप्रसिद्ध विद्वान् व उदारचरित डॉ. जाल पावरी यांनी, त्यांचे वडिलाचे स्मृत्यर्थ, अवेस्ताविषयक बहुमोल ग्रंथांचा संग्रह मंडळास

Posted at city-sorting office on 6 । 11 । 1969
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पत्रिका Regd. No. R. N. 14031/168
Licenced to post without pre-payment Licence No. 158

देणगी म्हणून दिलेला आहे. त्यामध्ये गतवर्षी ११० ग्रंथ मंडळाचे ग्रंथालयात दाखल झाले व चालू वर्षी ५८० ग्रंथ मिळाले.

हस्तलिखित पोथी संग्रह–

चालू वर्षी वाई येथील कै. आण्णाभट अभ्यंकर यांचेकडील वेदांग, श्रौत, स्मार्त, गणित इत्यादि विविध विषयांवरील एकूण ५२ पोथ्यांचा संग्रह, मंडळास देणगी म्हणून मिळाला. पुण्यातील एक संगीततज्ज्ञ कै. नरहरपंत पटवर्धन यांचेकडील विविध विषयांवरील ग्रंथ संग्रह व त्यांची स्वतःची संगीतविषयक हस्तलिखितें मंडळांस देणगी म्हणून मिळाली आहेत. सांगली येथील वैदिक कै. वेंकू दाजी गोरे व वाई येथील अभ्यंकर यांचेकडून आलेले पोथ्यांचे संग्रह वृत्तांतवर्षी तपासले. एकूण मंडळांत सुमारें ५५०० पोथ्यांचा संग्रह वृत्तांत वर्षअखेर संग्रह झाला आहे.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय–या महाविद्यालयांत विद्यापीठाच्या आयुर्विद्यापारंगत परीक्षेच्या अभ्यासाच्या अध्यापनाची सोय केलेली आहे.

टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव

वृत्तांतवर्षी विद्यालयांत प्राथमिक वर्गापासून सर्वोदय प्रवेश वर्गापर्यंत सर्व वर्ग व्यवस्थित सुरु होते. तसेंच चित्रकला, मूर्तिकला व संगीत इत्यादी कला वर्ग सुरु होते. वृत्तांतवर्षी सर्वोदय प्रवेश वर्गात १० विद्यार्थी, कलावर्गात ४ व संगीत वर्गात ६ विद्यार्थी होते. संस्थेतील २० विद्यार्थी वस्त्रस्वावलंबी होते. तसेंच खादी ग्रामोद्योग व तेलघाणी विभाग नित्याप्रमाणें चालू होते.

समारोप–

याप्रमाणें विद्यापीठाच्या विविध कार्यांचे संक्षिप्त इतिवृत्त आहे. विद्यापीठास सरकारी मान्यता लाभावी यासाठी सरकारदरबारी प्रयत्न चालू आहेत. समाजात उपयुक्त शैक्षणिक कार्य व्यापक स्वरूपांत करण्याची शक्यता सरकारी मान्यतेमुळे निर्माण होईल. जुन्या व नव्या पद्धतींचा समन्वय साधणारी संस्कृत अध्ययन पद्धति सुरु करणे, भारतीय विविध भाषांचा अभ्यासक्रम चालविणें, सामाजिक शास्त्रे, गांधी तत्त्वज्ञान, संस्कृत शास्त्राभ्यास या विषयांचे पदव्युत्तर अध्यापनाचे कार्य इत्यादि उद्दिष्टे विद्यापीठापुढें आहेत.

विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवासंबंधी जाहीर करण्यांत आलेल्या पत्रकामध्यें नमूद केलेल्या योजना कार्यान्वित करण्यासाठी अपेक्षित निधि जमविणें आवश्यक आहे. ५० अभिनव ग्रंथ प्रकाशित करण्याची योजना विद्यापीठाने स्वीकारली आहे. विद्यापीठाच्या वाढत्या कामांस सध्याची इमारत अपुरी असल्यामुळें नवीन इमारतींची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने टिळक विद्यापीठ नगरात बांधावयाच्या नियोजित इमारतीचा आराखडा तयार करण्यांत आला आहे. त्याप्रमाणें इमारतीचे बांधकामही सुरु झाले आहे. या वाढत्या कामांची जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्व प्रकारे साहाय्य सरकारने व जनतेने करावे अशी विनती.

शि. ह. धुपकर, कार्यवाह.

ही पत्रिका टि. म. विद्यापीठातर्फे संपादक, मुद्रक व प्रकाशक शि. ह. धुपकर, कार्यवाह, टि. म. वि. यांनीं टि. वि. मुद्र. गुलटेकडी, पुणें ९. येथें छापून तेथेंच प्रसिद्ध केली.